
वर्ष - 8 । अंक - 226 | UDYAM-MH-26-0158827



# महाईन्यूज™

## आतील पानांत


- बाबर आझमसमोर विराट कोहली शून्य
- भारताचा न्यूझीलंडवर नेत्रदीपक विजय!
- द्विपक्षीय चर्चेच्या नावाखाली दमदाटी!
- काँग्रेस कार्यकर्त्या नरवाल यांची हत्या


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 3 मार्च 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## पुणे - मुंबई द्रुतगती मार्गावर अवतरला पुष्पा

# पुष्पराज सिंडिकेटचा पर्दाफाश!

### कंटेनरमध्ये कोट्यवधींच्या रक्तचंदनाची तस्करी; मालमत्ता विरोधी पथकाची कारवाई

## आंतरराज्य तस्करांचे जाळे उघडकीस





**25 कोटीचे चंदन शिरगाव पोलिसांकडून जप्त**

। पिंपरी । प्रतिनिधी । महाईन्यूज

**पुणे - मुंबई द्रुतगती मार्गावर पिंपरी चिंचवड पोलिसांच्या मालमत्ता विरोधी पथकाने मोठी कारवाई करत कोट्यवधी रुपयांचे रक्तचंदन जप्त केले. एका कंटेनरमध्ये लपवून नेले जात असलेले हे रक्तचंदन पकडले गेल्याने आंतरराज्यीय तस्करांचे जाळे उघडकीस आले आहे. कंटेनरमध्ये साधारण 15 टन रक्तचंदन असल्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.**

बंगळुरूहून पुणे मार्गे मुंबईच्या दिशेने मोठ्या प्रमाणावर चंदनाची तस्करी होत असल्याची माहिती मालमत्ता विरोधी पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारे तात्काळ पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर सापळा रचला. संशयास्पद कंटेनर दिसताच पोलिसांनी त्याला थांबवले आणि चौकशी सुरू केली. सुरुवातीला वाहनचालक आणि तस्करांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, कंटेनर उघडून पाहताच मोठ्या प्रमाणावर रक्तचंदन लपवून ठेवलेले आढळले

पोलिसांनी त्वरित कारवाई करत संपूर्ण कंटेनर ताब्यात घेतला आणि त्यातील चंदनाचा साठा जप्त केला. जप्त केलेल्या चंदनाची किंमत कोट्यवधी रुपयांपर्यंत आहे. या चंदनाची तस्करी आंतरराष्ट्रीय बाजारात करण्याचा डाव होता, अशी माहिती तपासात पुढे आली आहे.

या प्रकरणात पोलिसांनी वाहनचालकासह संशयितांना ताब्यात घेतले आहे. प्राथमिक चौकशीतून हे चंदन बंगळुरूहून पुणे मार्गे मुंबईला पाठवले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. ही तस्करी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विक्रीसाठी करण्यात येत असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.



### आंतरराष्ट्रीय बाजारात तस्करी

बंगळुरुमधून निघालेल्या या चंदनाची आंतरराष्ट्रीय बाजारात तस्करी केली जाण्याची शक्यता आहे. मुंबई मार्गे हे चंदन आंतरराष्ट्रीय बाजारात पाठवले जाणार होते. त्यापूर्वीच पोलिसांनी ते जप्त केले. या माध्यमातून चंदनाची तस्करी करणारे रॅकेट समोर येण्याची शक्यता आहे.

पोलिसांनी अर्पित सिंग या व्यक्तीला आणि वाहन चालकाला अटक केली आहे. त्यांची चौकशी सुरु करण्यात आली आहे.

### असा रचला सापळा

पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर बंगळुरूवरुन निघालेले एक कंटनेर जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली. त्या कंटनेरमधून चंदनाची तस्करी केली जात असल्याचे पोलिसांच्या खबरीने सांगितले. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. कंटेनर पुणे मार्गे मुंबईच्या दिशेने जात होते. पोलिसांना ते संशयास्पद कंटेनर दिल्यावर त्याला थांबवले. त्याची चौकशी सुरु केल्यावर वाहन चालकाकडून उडवाउडवीची उत्तरे मिळू लागली. पोलिसांचा संशय वाढला. त्यांनी कंटेनर उघडून पाहताच पोलिसांना धक्का बसला. कंटनेरमध्ये मोठ्या प्रमाणावर चंदन लपवलेले होते. दहा ते बारा टन हे चंदन असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली. त्याची किंमत 20 ते 25 कोटी आहे.

# ‘उजनी’च्या पाण्याचा ‘उन्हाळा’?

## शहरातील चार तलावांच्या सुशोभीकरणाचे काम केले जाणार

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।



**यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये पूर्ण क्षमतेने शंभर टक्के भरलेले उजनी धरण गेल्या दोन महिन्यांतील बेसुमार पाणी वापराने अर्धे रिकामे झाले असून कडक उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच पाणीसाठा आज पन्नास टक्क्यांवर आला आहे. अशा पद्धतीने बेसुमार पाणी वापरल्यास उजनीच्या पाण्याचा ऐन उन्हाळ्यातच “उन्हाळा” होण्याची दाट शक्यता आहे.**

सध्या उजनी मध्ये केवळ सव्वीस टीएमसी पाणी चलसाठ्यात असून उन्हाळ्याच्या तोंडावर उजनीवर अवलंबून असलेले पाणलोट क्षेत्रातील शेतकरी उजनीच्या पाण्याच्या झळा आत्तापासूनच अनुभवत आहेत. याच पद्धतीने पाण्याचा वापर झाला तर ,लवकरच धरण मोकळे होण्याची भीती व्यक्त होत आहे.ऐन उन्हाळ्यात उजनीच्या पाण्याचा उन्हाळा होऊ लागल्याने उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. उजनीच्या पाण्याचा बेसुमार वापर थांबवावा. अशी आर्त हाक शेतकऱ्यांनी दिली असून आमच्या शेतीच्या उपसा सिंचन योजना व पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांचा विचार करून आता तरी उर्वरित पाण्याचे फेरनियोजन करा .अशी मागणी उजनी धरणग्रस्थ शेतकऱ्यांतून पुढे आली असून पाणलोट क्षेत्रातील लोकप्रतिनिधी उजनीच्या पाण्याबाबत गप्प का ? असा सवाल विचारला जात आहे. यावर्षीच्या आगामी उन्हाळ्याची दाहकता वेळीच ओळखून , आहे ह्या पाण्याचे जबाबदारीने नियोजन न झाल्यास मोठ्या गंभीर समस्येला तोंड द्यावे लागणार आहे .

याचे चित्र आता स्पष्ट दिसत आहे.सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा सांगोला व भीमा नदीच्या काठावरील पाणीपुरवठा योजना साठी उजनीतून भीमा नदीत आवर्तन सोडले जाते. एका आवर्तनाला सुमारे साडेपाच टीएमसी पाणी लागते .अशा प्रकारची दोन आवर्तने सोडली जातात. यामध्ये बारा टीएमसी पाणी नदीपात्रातून सोडले जाते .ही फार मोठी शोकांतिका आहे.

सोलापूरला पिण्याच्या पाण्यासाठी उजनीतून समांतर जलवाहिनीचे काम गेले कित्येक दिवस सुरू आहे. मात्र अजूनही ते काम पूर्णत्वास आले नसल्याने उजनीच्या पाण्याचा फार मोठा अपव्यय होत आहे.उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रांमध्ये समाधानकारक पाऊस पडला तरच उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरते. अन्यथा अनेक वेळा उजनी धरण पूर्ण क्षमतेने भरू शकत नाही.

पवसाने ओढ दिली तर आषाढी एकादशीला पंढरपूरला उजनीतून पाणी सोडावे लागते. असे अनेक वेळा घडले असून हे अनुभव पदरी असताना त्या दृष्टीने पाण्याचे नियोजन होत नाही. असा आरोप उजनी धरणग्रस्तांमधून सातत्याने होत आहे.गतवर्षी उजनी धरण ६० टक्के भरले होते .मात्र बेसुमार पाणी वापराची सवय लागल्याने ते पाणी पुरले नाही. मृत साठ्यातीलही साठ टक्के पाण्याचा वापर होऊन उजनी धरणाच्या गेल्या पंचेचाळीस वर्षाच्या इतिहासातील पाणीसाठ्याची निच्चांकी पातळीची नोंद झाली होती.या आठवणी ताज्या असताना सुद्धा उजनीच्या पाण्याचा बेसुमार वापर होत आहे .हा पाण्याचा वापर वेळीच रोखून उजनी धरणग्रस्तांच्या उपसा जलसिंचन योजनांना आठमाही ऐवजी बारमाही पाणी नियोजन करावे. अशी मागणी होत आहे.

### पाणी साठ्यामध्ये मोठी वाढ अपेक्षित

आता उजनीच्या पाण्याचा सुरुवातीपासूनच मोठा वापर सुरू झाला असल्याने दुष्काळाच्या खाईत उजनी धरणावर अवलंबून असलेल्या लोकांची वणवण लवकरच सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. नीरा- भीमा नदी जोड प्रकल्पाचे काम सध्या सुरू आहे. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर पुन्हा उजनीच्या पाण्याचा वापर वाढणार आहे.उजनीतील गाळ काढल्यास चार टीएमसी पाण्याची साठवण क्षमता वाढेल ,असे जाणकारांचे मत आहे.उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात नदी किनारी मोठ्या प्रमाणात शेतीच्या उपयुक्त माती आहे.

# पुणे पोलिसांकडून अचानक नाकाबंदी!

## तीन हजार वाहनचालकांची तपासणी; 72 वाहने जप्त

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।




**शहरातील गुन्हेगारी घटना, तसेच बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलिसांनी शनिवारी अचानक नाकाबंदी केली. नाकाबंदीत तीन हजार वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. नियमभंग करणाऱ्या ५१४ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांच्याकडून सात लाख ४६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पोलिसांनी या कारवाईत ७२ वाहने जप्त केली.**

शहर परिसरातील गुन्हेगारी घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शनिवारी रात्री अचानक वेगवेगळ्या भागात नाकाबंदी केली. पोलिसांनी दोन हजार ८५३ वाहनचालकांची तपासणी केली. विरुद्ध दिशेने वाहन चालविणे, मोटार चालविताना आसनपट्टा न लावणे, तसेच ट्रिपल सीट जाणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध कारवाई करण्यात आली. शनिवारी रात्री दहा ते बारापर्यंत प्रमुख रस्ते, तसेच चौकात पोलिसांनी नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी केली. या कारवाईत पोलिसांनी वाहतूक नियमभंग करणाऱ्या ५१४ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांच्याकडून सात लाख ४६ हजार रुपयांचा दंड वसूल केला, तसेच ७२ वाहने जप्त केली.पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त पोलीस आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त, पोलीस निरीक्षक, तसेच १८७२ पोलीस कर्मचारी नाकाबंदी कारवाईत सहभागी झाले होते. यापुढील काळात शहरात अचानक नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी करण्यात येणार असून, वाहनचालकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. शहरातील गुन्हेगारी घटना, तसेच बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलिसांनी शनिवारी अचानक नाकाबंदी केली. नाकाबंदीत तीन हजार वाहनचालकांची तपासणी करण्यात आली. नियमभंग करणाऱ्या ५१४ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांच्याकडून सात लाख ४६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. पोलिसांनी या कारवाईत ७२ वाहने जप्त केली.

या कारवाईत पोलिसांनी वाहतूक नियमभंग करणाऱ्या ५१४ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांच्याकडून सात लाख ४६ हजार रुपयांचा दंड वसूल केला, तसेच ७२ वाहने जप्त केली.

### बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई

पोलिसांनी नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी केली. या कारवाईत पोलिसांनी वाहतूक नियमभंग करणाऱ्या ५१४ वाहनचालकांविरुद्ध कारवाई करुन त्यांच्याकडून सात लाख ४६ हजार रुपयांचा दंड वसूल केला, तसेच ७२ वाहने जप्त केली.बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलिसांनी शनिवारी अचानक नाकाबंदी केली.

## संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलाचे


# शुक्लकाष्ठ संपेना!

### इंद्रायणीनगर येथील क्रीडा संकुल दुरुस्तीसाठी पुन्हा बंद; खेळाडूंसह पालकांमध्ये नाराजी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागील दोन वर्षांमध्ये भोसरीतील इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल जेमतेम तीन महिनेच खेळाडूंच्या सरावासाठी उपलब्ध झाले होते. आता ते पुन्हा दुरुस्तीसाठी बंद करण्यात आल्याने खेळाडू आणि त्यांच्या पालकांमधून संताप व्यक्त होत आहे. पिंपरी - चिंचवड महापालिकेने दुरुस्तीचे काम तातडीने संपवून हे क्रीडा संकुल सरावासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी खेळांडूमधून होत आहे. साधारण पाच आठवड्यांसाठी हे क्रीडा संकुल बंद राहणार आहे.**





पिंपरी - चिंचवड शहरात संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलात एकमेव ॲथलेटिक ट्रॅक आहे. मार्च २०२३ पासून दुरुस्तीसाठी ट्रॅक बंद ठेवण्यात आला होता. तो मार्च २०२४ रोजी सुरू करण्यात आला. एक महिना सुरू राहिल्यानंतर हा ट्रॅक पुन्हा दुरुस्तीसाठी बंद करण्यात आला. त्यानंतर सप्टेंबर २०२४ रोजी ट्रॅकच्या दुरुस्तीच्या कामाला सुरूवात झाली होती. त्याचे काम महापालिकेने पूर्ण केले. मात्र, गोळाफेक, थाळी फेक, लांब उडी, उंच उडी, भाला फेक आदी खेळांसाठी असलेल्या 'डी सेक्शन' मैदानाच्या दुरूस्तीचे काम त्यावेळेस पूर्ण केले नाही. आता या कामासाठी हा ट्रॅक पुन्हा बंद करण्यात आला असून तशी नोटीस संकुलाच्या प्रवेशद्वारावर लावण्यात आली आहे.

ट्रॅक बंद ठेवल्याने खेळाडूंच्या अडचणी वाढल्या आहेत. शहरातील एकमेव ट्रॅक बंद राहिल्याने सरावाचा अभाव निर्माण झाला आहे. आर्थिक अडचणीमुळे पुण्यात सरावाला जाणे अशक्य होते. पुण्यातील ये - जा करण्यासाठी अधिक वेळ वाया जातो. सरावा अभावी जिल्हा, राज्य, राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेतील कामगिरीवर परिणाम होतो. सरावाअभावी २०२३-२४ या वर्षात राज्यस्तरावरील ॲथलेटिक्स स्पर्धेत नऊ तर राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत फक्त दोन खेळाडूंची निवड झाली. ही गेल्या दहा वर्षांतील सर्वात नीचांकी कामगिरी झाली असल्याचे पिंपरी - चिंचवड ॲथलेटिक्स असोसिएशनचे म्हणणे आहे. त्यामुळे खेळाडूंच्या झालेल्या नुकसानीस जबाबदार कोण, असा संतप्त सवाल पालकांमधून विचारला जात आहे.

> "संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील ट्रॅक अग्निशमन केंद्राच्या भरतीसाठी देण्यात आल्याने दुरुस्तीचे काम मध्येच थांबविण्यात आले होते. आता पुन्हा या दुरुस्तीच्या कामासाठी हे संकुल बंद करण्यात आले आहे. सध्या ॲथलेटिक ट्रॅकवर पुन्हा नव्याने थर देऊन मार्गिकेच्या (लेन) पांढऱ्या पट्ट्या मारण्यात येणार आहेत. ही कामे १५ दिवसांत पूर्ण होतील. त्यानंतर ट्रॅक सुरू होईल."
> **–विजय जाधव,** (कार्यकारी अभियंता - स्थापत्य उद्यान - महापालिका)

---

## पिंपरी चिंचवड शहरातील 42 टन कचऱ्याचे संकलन

### महास्वच्छता अभियान : नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा उपक्रम

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र भूषण तीर्थरूप डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरात रविवारी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत सुमारे 42 टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. यामध्ये 13 टन ओला कचरा आणि 29 टन सुका कचरा संकलित करण्यात आला. तसेच शहरातील एकूण 43 कि.मी. लांबीचा दुतर्फा रस्त्याची स्वच्छता या अभियानात करण्यात आली.**




पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगड भूषण डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे महास्वच्छता अभियान रविवारी संपूर्ण महाराष्ट्रभर घेण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी चिंचवड शहरातील चिंचवड, निगडी, थेरगाव, पिंपरी परिसरात हे अभियान संपन्न झाले.

या मोहिमेत डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे सुमारे दोन हजारांहून अधिक श्रीसदस्यांनी सहभाग नोंदवला. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांसह शहरातील विविध सामाजिक, शैक्षणिक, सेवाभावी संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही उत्स्फूर्तपणे अभियानात सहभाग घेतला.

सदर महास्वच्छता अभियानांतर्गत पिंपरी चिंचवड शहरातील निगडी येथील भक्ती शक्ती चौक परिसर, दुर्गा टेकडी परिसर, म्हाळसकांत चौक परिसर, त्रिवेणी चौक परिसर, थरमॅक्स चौक परिसर, बर्ड व्हॅली गार्डन परिसर, साने चौक परिसरातील भाजी मंडई परिसर, थेरगाव येथील डी-मार्ट परिसर, धनगर बाबा मंदिर परिसर, काळेवाडी फाटा ते डांगे चौक परिसर, तापकीर चौक परिसर, बारणे कॉर्नर परिसर, पिंपरीतील भाट नगर येथील स्मशानभूमी परिसर, वाल्हेकरवाडी चौक परिसर, मोरया गोसावी मंदिर परिसर आणि चिंचवड भाजी मंडई परिसर या भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

### अडीच हजार श्रीसदस्यांचा मोहिमेत सहभाग

या मोहिमेत डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने राबविण्यात आलेल्या महास्वच्छता अभियानात पिंपरी चिंचवड शहरातील विविध मान्यवर आणि संघटनांनी सहभाग नोंदवला. यामध्ये भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुखदेव खटके, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे हेमंत डांगे, सामाजिक कार्यकर्ते आप्पा बागल, पोलीस वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष गजानन चिंचवडे, पिंपरी न्यायालयाचे सरकारी वकील ॲड. संजय राठोड, खान्देश युवा महासंघचे अध्यक्ष माऊली जगताप, पिंपरी चिंचवड व्यापारी संघटना, चंद्ररंग असोसिएट, सह्याद्री अकॅडमीचे सोपान पाटील, द्रोणाचार्य अकॅडमीचे उमेश बोरसे, एज्युनिव्ह इन्स्टिट्यूटचे संचालक नितीन माने, एच.आर. डी. सेंटरचे वीरेंद्र सेंगर, ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष विकास ढोले, स्किलअप सॉफ्टवेअर अँड आयटी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे सचिन पवार सहभागी झाले होते.




# नदी पुनरुज्जीवन की पुरांची शाश्वत हमी?

**गुजरातमधील साबरमती नदीच्या धर्तीवर पुण्यातील मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण योजना राबविण्याचा मानस पुणे महापालिकेत २०१७ मध्ये सत्तेवर आलेल्या भारतीय जनता पक्षाने व्यक्त केला आणि नंतर प्रत्यक्ष कामही सुरू झाले. तब्बत ४ हजार ७२७ कोटी रुपयांच्या या महत्त्वाकांक्षी योजनेवर अनेक आक्षेप घेतले जात आहेत.**

मात्र, त्यानंतरही भाजप आणि महापालिका प्रशासनाची या योजनेसाठी आग्रही भूमिका कायम आहे. यासाठीचे सर्व पैसे करदात्यांच्या खिशातून खर्च होणार आहेत. त्यामुळे ही योजना नेमकी काय आहे, तिचे दूरगामी परिणाम काय होतील, या सर्व प्रश्नांची शास्त्रीय उत्तरे शोधणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे.एके काळी हिरव्यागार टेकड्या, स्वच्छ वाहत्या नद्या आणि समृद्ध जैववैविध्यासाठी ओळखले जाणारे पुणे अलीकडच्या काही वर्षांत पर्यावरणाच्या दृष्टीने संवेदनशील झाले आहे. मोठ्या प्रमाणावरील नागरीकरणात नद्या, नाले आणि ओढ्यांच्या



पात्रांवर अतिक्रमण झाले आहे. नद्यांमधील जैववैविध्य नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. टेकड्या उजाड झाल्या आहेत. नद्यांची वहनक्षमता कमी झाल्याने आणि शहराची संपत्ती म्हणून नद्यांकडे पाहिले जात नसल्याने नद्यांचे संवर्धन, पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता अधोरेखित झाली आणि त्यातूनच पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून वाहणाऱ्या मुळा-मुठा नदीकाठांच्या संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरणाची योजना पुढे आली. या योजनेसाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. मात्र हा प्रश्न केवळ आर्थिक नाही. तर कधीही भरून न निघणाऱ्या पर्यावरणाच्या हानीचाही आहे. तो नद्यांच्या काठांपुरता सीमित नसून, तेथून दूर राहणाऱ्यांच्या घरांच्या अस्तित्वाचाही आहे. शहर परिसरातून मुठा, मुळा, पवना, रामनदी आणि देवनदी या नद्या वाहतात. या पाचही नद्यांचा संगम होऊन मुळा-मुठा ही एक नदी बाहेर पडते. अनेक घटकांमुळे या नद्यांचा ऱ्हास होत आहे. पूरनियंत्रण, नद्यांची स्वच्छता, त्यांचे पुनरुज्जीवन आणि नद्यांचे आणि नागरिकांचे नाते जोडणे या उद्देशाने मुळा-मुठा नदीकाठ संवर्धन, पुनरुज्जीवन आणि सुशोभीकरण ही योजना राबविण्यात येत आहे, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. मुळा, मुठा आणि मुळा-मुठा या ४४ किलोमीटर लांबीच्या नद्यांचे पुनरुज्जीवन होईल, असा दावाही करण्यात येत आहे. मुबलक पाण्यामुळे शहराची वाढ मोठ्या प्रमाणावर झाली आहे. मात्र याला दुसरी बाजूही आहे. २०१९ मध्ये आंबिल ओढ्याला व नद्यांना आलेल्या पुराने अवघ्या काही तासांत शेकडो घरे उद्ध्वस्त झाली. कोट्यवधी रुपयांचे नुकसान होऊन २५ निष्पाप नागरिकांना प्राण गमवावे लागले. असाच अनुभव पुणेकरांनी २०२४ सालीही घेतला. हे असे का होत आहे? पूर्वीदेखील असेच होत होते का? भविष्यातही सातत्याने पूरपरिस्थिती निर्माण होणार का? याला जबाबदार कोण? असे अनेक प्रश्न यानिमित्ताने पुढे येत आहेत. मात्र, खरा प्रश्न आहे तो शास्त्रशुद्ध उत्तरे कधी शोधली जाणार हा.मुळा-मुठा नदीमुळे पाच वेगवेगळ्या पाणलोट क्षेत्रांतून पुण्यात पाणी येते मुसळधार पावसात चहुबाजूंनी शहराच्या मध्यभागाकडे वेगाने पाणी येते व पूरपरिस्थिती निर्माण होते. या नद्यांवर पुण्याच्या ऊर्ध्व बाजूला सात लहान-मोठी धरणे आहेत आणि ती अंतराच्या दृष्टीने एकमेकांपासून फारशी लांब नाहीत. या सर्व नद्यांचे वैशिष्ट्य

# मानवी प्रगतीसाठी वन्यजीवांना त्रास नको

जागतिक वन्यजीव दिन विशेष

डॉ. प्रितम भि. गेडाम
८२३७४ १७०४१

दरवर्षी 3 मार्च रोजी “जागतिक वन्यजीव दिन” हा जगातील वन्यजीव आणि वनस्पतींबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी सर्वात महत्वाचा जागतिक वार्षिक कार्यक्रम म्हणून साजरा केला जातो. आपण विज्ञान आणि तांत्रिक साधनांशिवाय जगू शकतो पण या निसर्गाशिवाय नाही, वन्यजीवांचे संवर्धन ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. या विषयाच्या गांभीर्यावर प्रकाश टाकण्याचा हा प्रयत्न. वन्यजीव हे पृथ्वीवरील संपूर्ण जीवसृष्टीचा आधार आहेत. जेव्हा पृथ्वीवरून वन्यजीवांचे अस्तित्व पूर्णपणे नष्ट होईल, तेव्हा मानवी जीवनाचा अंत अतिशय वेदनादायक पद्धतीने होणार. वन्यजीवांमुळे जंगले समृद्ध होतात, जंगलांमुळे पाण्याचे स्रोत समृद्ध होतात, झाडे मातीची धूप रोखतात आणि सुपीक जमिनीचे संरक्षण करतात. सर्वांना शुद्ध पाणी आणि शुद्ध ऑक्सिजन मिळते, ऋतूचक्र व्यवस्थित चालते, वेळेवर पुरेसा पाऊस पडतो, हवामान आणि निसर्ग यांच्यात संतुलन राखले जाते, सर्व प्राण्यांची अन्नसाखळी सुरळीत चालते. मानव आणि वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी होतो. नैसर्गिक आपत्ती कमी होतात, पिके फुलतात, समाजातील प्रत्येक घटकाला पोषक तत्वांनी समृद्ध असलेले निरोगी अन्न मिळते. आजार कमी होतात, देश स्वावलंबी होतो, नैसर्गिक संसाधने समृद्ध होतात. देशातील दर्जेदार अन्नधान्य आणि उत्पादनांची निर्यात वाढून आयात कमी करण्यास मदत होते. मुबलक प्रमाणात उत्पादनामुळे महागाई कमी होते आणि अशुद्धता, भेसळ आणि घातक रसायनांचा वापर यासारख्या वाईट गोष्टी कमी होतात. मानवाचे राहणीमान सुधारते आणि अशा प्रकारे मानव आणि देश खऱ्या अर्थाने प्रगती करतात.



जर आपण बारकाईने निरीक्षण केले तर मानवाचे संपूर्ण जीवन वन्यजीवांवर आधारित असल्याचे दिसून येते. मानव सतत निसर्गाचा नाश करत आहे, परंतु वन्यजीवांमुळेच मानवी जीवनाचे अस्तित्व टिकून आहे, कारण वन्यजीव हे जंगले आणि निसर्गाचे मुख्य रक्षक आहेत. या २०२५ वर्षीच्या जागतिक वन्यजीव दिनाची थीम “वन्यजीव संवर्धन वित्त: लोक आणि ग्रहात गुंतवणूक” आहे. वन्यजीव संवर्धन प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी शाश्वत आर्थिक उपायांची तातडीची गरज यावर ही थीम लक्ष केंद्रित करते; वन्यजीव संवर्धनाला चालना देण्यासाठी नाविन्यपूर्ण आर्थिक यंत्रणांची आवश्यकता आहे. देशाच्या वाढत्या लोकसंख्येला सुखसोयी पुरविण्यासाठी मर्यादित नैसर्गिक संसाधनांवर अमर्याद दबाव आहे. आपण शहरांमधून सुंदर किलबिलाट करणारे पक्षी आधीच हाकलून लावले आहे. शहरे आता महानगरांचे रूप धारण करत आहेत, शहरांभोवतीची गावे, जंगले, शेतजमीन, पाण्याचे स्रोत, नैसर्गिक संसाधने झपाट्याने कमी होत आहेत. शहरे आणि महानगरांमधून वाहणाऱ्या नद्यांनी आता नाल्यांचे रूप धारण केले आहे; विषारी कचरा, ई-कचरा आणि जैव वैद्यकीय कचऱ्याचे प्रचंड डोंगर सतत वाढत आहेत. मानवी जीवनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक उत्पादनाचा कच्चा माल निसर्गाकडून मिळतो, नैसर्गिक संसाधनांच्या अतिरेकी वापरामुळे आपत्ती आणि प्राणघातक आजार सतत वाढत आहेत.

लोकसंख्येनुसार शहरांमध्ये नवीन वस्त्या तयार होत आहेत, रस्त्यावर माणसांपेक्षा जास्त वाहने आहेत. पृथ्वीच्या तापमानात सतत बदल होत आहेत, मोठे हिमखंड वितळत आहेत. शहरे आणि गावांमध्ये भूजल पातळी सतत घसरत आहे, याचा थेट परिणाम पिकांवर होत आहे, तापमान वाढत आहे, अन्नधान्याची आयात वाढत आहे. प्रदूषण, गोंगाटा, आर्थिक असमानता आणि गुन्हेगारी वाढत आहे. जंगलातील वन्यजीवांना अन्न आणि पाण्यासाठी मानवी वस्तीत यावे लागते, त्यामुळे मानव आणि वन्यजीवांमधील संघर्ष वाढत आहे. आपण भावी पिढ्यांसाठी असलेल्या संसाधनांचाही वापर केला आहे. आपण निसर्गाकडून जे काही घेतो ते आपल्याला परत द्यावे लागते, पण आजच्या युगात स्वार्थी माणूस निसर्गाला पिळून त्याच्याकडून हिसकावून घेत आहे, माणूस निसर्गाच्या प्रत्येक भागात आपला वाटा निर्माण करत आहे. वन्यजीव नेहमी मानवी हस्तक्षेपापासून दूर राहण्याचा प्रयंत्न करतात, परंतु मानवच सतत स्वताची व्याप्ती वाढवत आहे, वन्यजीवांना अन्न शोधणे आणि जगण्यासाठी स्पर्धा करणे कठीण बनवत आहे. वन्यजीवांना त्यांच्या प्राणांचे बलिदान देऊन हवामान बदलाच्या परिणामांची सर्वात मोठी किंमत मोजावी लागते. मानवी प्रगतीमुळे वन्यजीवांचे थेट नुकसान होते, त्यांचे नैसर्गिक अधिवास नष्ट होतात आणि प्रदूषणामुळे मृत्यू होतात. अनेक वेळा रस्ते अपघात, वीज कोसळणे, उघड्या खड्डयात किंवा शेताच्या विहिरीत बुडून वन्य प्राण्यांचा मृत्यू होतो. रस्त्यांचा विकास वाढत असताना, वेगवान वाहनांमुळे वन्य प्राण्यांच्या मृत्यूचा धोका वाढतो. वन्य प्राण्यांसाठी शिकार हा आणखी एक धोका आहे. वन्यजीवांमध्ये मृत्यूची इतर कारणे म्हणजे रोग, दुखापत, परजीवीवाद, उपासमार, कुपोषण, निर्जलीकरण, हवामान परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती आणि इतर प्राण्यांकडून होणारी शिकार. वाढत्या मानवी क्रियाकलापांमुळे तलाव, गवताळ प्रदेश आणि जंगले यांसारख्या अधिवासांचे नुकसान होते, ज्यामुळे वन्यजीवांना सहज वावरणे कठीण होते. परिसंस्थेत सतत बदल होत असतात, ज्यामुळे वन्यजीवांना अन्न, पाणी आणि त्यांच्या पिल्लांना वाढवण्यासाठी चांगल्या नैसर्गिक जागांपासून वंचित ठेवले जाते. प्रदूषणामुळे हवा, माती आणि पाणी दूषित होऊन जंगलांपर्यंत पोहोचते. वर्ल्ड वाइल्डलाइफ फंडच्या लिव्हिंग प्लॅनेट रिपोर्ट २०२४ नुसार, गेल्या ५० वर्षांत (१९७०-२०२०) वन्यजीवांच्या लोकसंख्येचा सरासरी आकार विनाशकारीरीत्या ७३ टक्क्यांनी कमी झाला आहे. पृथ्वीच्या काही भागांमध्ये धोकादायक पातळीला पोहोचत आहे, ज्यामुळे मानवतेसाठी गंभीर धोका निर्माण झाला आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# तर आम्ही थेट राजीनामा मागू!

## फडणवीसांचं धनंजय मुंडे आणि कोकाटेंबाबत मोठं विधान

।परभणी। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाचा तपास एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन समितीकडून चौकशी सुरु आहे. या प्रकरणात आता राज्य गुन्हा अन्वेषण विभागाने दोषारोपपत्र सादर केलं. यामध्ये वाल्मिक कराड हाच हत्येच्या प्रकरणात मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर आली. दरम्यान, मंत्री धनंजय मुंडे यांचा वाल्मिक कराड हा निकटवर्तीय असल्याचा आरोप केला जातो. यावरून धनंजय मुंडे यांचा राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधक करत आहेत.**

.माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावल्याप्रकरणी त्यांचाही राजीनामा घेतला जावा, अशी मागणी विरोधक करत आहेत. दरम्यान, या घटनेच्या संदर्भात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचक पण थेट इशारा देणारं विधान केलं.'नैतिकतेचं अध:पतन झालं आहे असं वाटल्यास आम्ही थेट राजीनामा मागू', असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत सरकारकडून याआधीच भूमिका स्पष्ट करण्यात आलेली आहे. अनेकवेळा अशा प्रकारच्या प्रश्नांमध्ये राजीनामा द्यावा की नाही द्यावा? असे अनेक मुद्दे उपस्थित होतात. त्याबाबत आमच्याकडेही भरपूर चर्चा झालेली आहे. त्या चर्चेच्या अंती मी आपल्यासमोर वस्तुस्थिती मांडली. कुठेही नैतिकतेचं अध:पतन झालेलं आहे असं जर आमच्या लक्षात आलं तर आम्ही कोणालाही वाचवणार नाहीत. आम्ही थेट त्यांचे राजीनामे मागू", असा सूचक इशारा मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी दिला. तसेच माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भात क्लोअज फॉर ऑर्डर असल्यामुळे त्याबाबत आम्हाला सध्या कोणतीही भूमिका मांडता येत नाही, असंल्याचंही देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आमची टीम जुनीच आहे, फक्त आमच्या दोघांच्या खुर्च्या बदलल्या आहेत, पण अजित पवारांची खुर्ची फिक्स असल्याचं मिश्किल वक्तव्य करत टोला लगावला. यावर लगेचच अजित पवार यांनीही उत्तर दिलं. "तुम्हाला (एकनाथ शिंदे) खुर्ची (मुख्यमंत्री पदाची खुर्ची) फिक्स ठेवता आली नाही, त्याला मी काय करू", असं म्हणत अजित पवार यांनी एकनाथ शिंदेंची फिरकी घेतली.यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की आमची रोटेटिंग चेअर आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांच्या कारकीर्दीतील काही निर्णयाला स्थगिती दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. यामध्ये माजी आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या काळातील ३,२०० कोटी रुपयांच्या कंटात्राला स्थगिती दिल्याचं बोललं जात आहे. यावरून राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत. या चर्चावर आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच आपण कोणतीही स्थगिती दिली नसल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मात्र, जिथे एखादी चूक होत आहे असं लक्षात आलं तर मी नक्कीच स्थगिती देईल, असं सूचक विधानही देवेंद्र फडणवीसांनी केलं.अलिकडच्या काळात मला रोज स्थगितीच्या बातम्या पाहायला मिळतात. मी स्थगिती दिल्याचं मला रोज ऐकायला मिळतं. त्यानंतर मला माझ्या कार्यालयाला विचारावं लागतं की आपण अशा काही कामांना स्थगिती दिली आहे का? मग ते म्हणतात आपल्याकडे अशी फाईलच आलेली नाही. अलिकडच्या काळात दोन गोष्टी माझ्या लक्षात आल्या की एक म्हणजे आमच्याकडे कोणत्याही आमदाराने निवेदन दिल्यानंतर त्यामध्ये त्यांनी काही मागणी केली असेल किंवा एखादा आरोप जरी केला असेल तरी आम्ही तपासून कारवाई करतो असं लिहितो. आम्ही कधी दूर्लक्ष करत नाहीत", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

### तर मी नक्कीच स्थगिती देईल

आरोग्य विभागाच्या कामांच्या स्थगितीबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं की, "आरोग्य विभागाच्याबाबतीत केंद्र सरकारने जे काही पैसे आपल्याला दिले होते, त्यामध्ये आपण जे काही कामे सुचवली होती, त्या कामांमध्ये ९ टक्के पैसा खर्च केला होता. त्यावर केंद्र सरकारचं म्हणणं होतं की तो पैसा ५ टक्के केला पाहिजे. त्यामुळे केंद्र सरकारने हे आपल्याला कळवलं. त्यानुसार संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी आणि सचिवांनी माहिती मागवली की कोणती कामे प्रायोरिटीने करायची. पण अशा पद्धतीची फाईल माझ्याकडे आलेली नाही आणि मी त्यावर कोणतीही स्थगिती दिलेली नाही.

# आम्ही तुम्हाला हलक्यातच घेतो हे विसरु नका

## खासदार संजय राऊत यांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना टोला

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मला हलक्यात घेऊ नका ज्यांनी मला हलक्यात घेतलं त्यांचा टांगा पलटी करुन आलो आहे असं वक्तव्य एकनाथ शिंदे यांनी म्हटलं होतं. त्यांना शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी उत्तर दिलं आहे. आम्ही दाढीला हलक्यातच घेतो असं संजय राऊत म्हणाले.**



ठाण्यातून नवा इतिहास घडेल वर्तुळ पूर्ण होऊ द्या. हे दिवसही जातील आणि पुन्हा एकदा ठाण्याच्या आपल्या शिवसेनेचा विजयानेच होईल. इतिहास वर्तुळ पूर्ण करेल आणि पुन्हा इतिहास लिहिला जातो तो नवा इतिहास ठाण्यातूनच लिहिला जातो हे कुणीही विसरु नये. मगाशी कुणीतरी म्हणालं की याला पकडून आणतात, त्याला पकडून आणतात एक दिवस एकनाथ शिंदेंना लोक पकडून आणतील. याला घेता का तुमच्या पक्षात विचारतील. जे कुणी गेले आहेत ना ते लाभार्थी आणि डरपोक लोक आहेत. . यांच्याकडे विचार, स्वाभिमान, अभिमान, नीतीमत्ता हे सगळं औषधाला जरी असतं तर बाळासाहेब ठाकरेंच्या पक्षाशी त्यांनी इतकी बेइमानी केली नसती असं संजय राऊत म्हणाले.शिवसेना फोडणं हे अमित शाह आणि नरेंद्र मोदींचं स्वप्न होतं. त्यामुळे डरपोक आणि कमजोर कडी हाताशी धरली आणि आपला पक्ष फोडला. राजकारणात आमचेही केस पांढरे झाले, आम्ही आता कलर लावून फिरतो. तुम्ही (एकनाथ शिंदे) दाढीला कलर लावता आम्ही डोक्याला लावतो. दाढीला हलक्यात घेऊ नका असं ते म्हणतात आम्ही तुम्हाला हलक्यातच घेतो. कारण आम्हाला तुम्हाला वजनदार समजण्याचं कारण नाही. तुमचं सगळं आम्ही डोळ्यांनी पाहिलं आहे. पण शिवसैनिकांनो आता ही लढाई आहे. महापालिका निवडणुका येतील. महापालिकेपासूनच आम्ही पुन्हा आमच्या विजयाला सुरुवात करु. असं म्हणत राऊत यांनी एकनाथ शिंदेंवर टीका केली. लुटलेल्या पैशांची मस्ती आम्हाला दाखवू नका. आम्ही लुटायला सुरुवात केली तर आधी तुमच्या कंबरेवरचे कपडे लुटून घेऊ. तिथून आमची सुरुवात होईल तुमची अब्रू तर गेलेली आहे. हा महाराष्ट्र छत्रपती शिवराय यांचं नाव सांगतो, हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राची ओळख स्वाभिमानी अशी देशात निर्माण करुन दिली. आपण मात्र माती खाल्लीत. मी आज इतकंच सांगेन की छत्रपती शिवाजी महाराजांच्या महानिर्वाणानंतर आणि छत्रपती संभाजी राजेंच्या निर्घृण हत्येनंतर मोगल आणि औरंगजेब हे आनंदाने बेहोश होऊन नाचू लागले होते.

### हा गद्दारांचा इतिहास नाही

महाराष्ट्र आमच्या हातात आला. पण तसं झालं नाही. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही महाराष्ट्र पुढची २५ वर्षे लढत राहिला आणि झुंजत राहिला. शेवटी औरंगजेबाचं थडगं महाराष्ट्रातच बांधलं हा इतिहास आहे. जे आमच्यावर चाल करुन आलेत त्यांनी हा इतिहास समजून घेतला पाहिजे. हा गद्दारांचा इतिहास नाही.

# द्विपक्षीय चर्चेच्या नावाखाली दमदाटी!

## राष्ट्रप्रमुखांच्या संवादादरम्यान प्रथमच व्हाइट हाऊसमध्ये जाहीर वादंग

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**रशिया आणि युक्रेनदरम्यान सुरू असलेले युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प महत्त्वाची भूमिका बजावतील अशी अपेक्षा ठेवून गेलेल्या युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांना प्रत्यक्षात जाहीर दमदाटीला सामोरे जावे लागले. त्यानंतर त्यांनी चर्चा अर्धवट सोडली आणि अमेरिका, व्हाइट हाऊस आणि अमेरिकी जनतेचे जाहीर आभार मानून तेथील उर्वरित कार्यक्रम रद्द करून निघून जाणे पसंत केले.**



अमेरिकेच्या आणि व्हाइट हाऊसच्या इतिहासात प्रथमच एका अभ्यागत राष्ट्रप्रमुखाला जाहीरपणे अशी वागणूक देण्यात आली आहे, तीही थेट देशाच्या सर्वोच्च नेत्याकडून. विशेष म्हणजे या बैठकीचे संपूर्ण जगामध्ये जाहीर प्रसारण झाले, त्यामुळे संपूर्ण जगाने तेथील वाद पाहिला. या अभूतपूर्व घटनेनंतर युरोपीय देशांनी जाहीरपणे युक्रेनला पाठिंबा दिला असून रशिया-युक्रेन युद्ध कसे थांबवायचे असा नवीन पेच उभा राहिला आहे. व्हाइट हाऊसमध्ये झालेल्या बैठकीत अध्यक्ष ट्रम्प हे झेलेन्स्की यांच्यावर अक्षरशः खेकसत असल्याचे दिसले. व्हाइट हाऊसकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनानुसार ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांच्यावर लक्षावधी लोकांचे जीव धोक्यात घालत असल्याचा आरोप केला. त्यांच्या या कृत्यांमुळे तिसरे विश्वमहायुद्ध होईल असा इशाराही दिला. हे युद्ध युक्रेनमधून इस्रायलमध्ये आणि पुढे आशियात पसरेल असे ट्रम्प म्हणाले. युद्धसमाप्तीच्या करारासाठी रशियाबरोबर वाटाघाटी करताना युक्रेनची परिस्थिती फारशी चांगली नसून झेलेन्स्की यांच्याकडे नमते घेण्याशिवाय पर्याय नाही असे ट्रम्प यांनी सुचवले. त्याच वेळी झेलेन्स्की यांनी मात्र रशिया आमचे मारेकरी असून त्यांच्याशी कोणतीही तडजोड मान्य नसल्याची भूमिका कायम ठेवली. त्यानंतर नाराज झालेल्या ट्रम्प यांनी "तुम्हाला आमच्याशी करार करायचा असेल तर करू शकता, मी तुम्हाला ताकद देऊ शकतो. तुम्ही कणखर आहात पण अमेरिकेच्या पाठिंब्याशिवाय नाही. तुमच्याकडे फारसे पर्याय नाहीत, एकदा आपण करार केला की तुम्ही अधिक चांगल्या स्थितीमध्ये असाल. पण, आम्ही दिलेल्या पाठिंब्यासाठी तुम्ही कृतज्ञ नाही आणि ही काही फार चांगली गोष्ट नाही," असे झेलेन्स्की यांना ऐकवले. या चर्चेदरम्यान रशिया-युक्रेन युद्धसमाप्तीबरोबरच युक्रेनमधील दुर्मीळ खनिजांची अमेरिकेला विक्री करण्याचा करारही मार्गी लागणे अपेक्षित होते. अमेरिकेच्या पाठिंब्यासाठी युक्रेनने खनिजांची विक्री करावी असा ट्रम्प यांचा आग्रह होता. प्रत्यक्षात हा करार न करताच चर्चा अर्धवट सोडून झेलेन्स्की निघून गेले. व्हाइट हाऊस सोडल्यांतर काहीच मिनिटांमध्ये झेलेन्स्की यांनी "धन्यवाद अमेरिका, तुमच्या पाठिंब्यासाठी, या भेटीसाठी आभार. अमेरिकेचे अध्यक्ष, काँग्रेस आणि अमेरिकी जनतेचे आभार. युक्रेनला केवळ शांतता हवी आहे आणि आम्ही त्यासाठीच प्रयत्न करत आहोत," असे 'एक्स'वर लिहित अमेरिकेचे आभार मानले. अमेरिकेतून निघालेले झेलेन्स्की शनिवारी ब्रिटनला पोहोचले. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी रविवारी आयोजित केलेल्या युरोपीय नेत्यांच्या शिखर परिषदेला ते उपस्थित राहणार आहेत. परिषदेमध्ये फ्रान्स, जर्मनी, डेन्मार्क, इटली, नेदरलँड्स, नॉर्वे, पोलंड, स्पेन, तुर्की, फिनलंड, स्वीडन, झेक प्रजासत्ताक आणि रोमानिया या देशांचे नेतेही युद्ध थांबवण्यासाठी चर्चा करतील. अमेरिकेच्या आणि व्हाइट हाऊसच्या इतिहासात प्रथमच एका अभ्यागत राष्ट्रप्रमुखाला जाहीरपणे अशी वागणूक देण्यात आली आहे, तीही थेट देशाच्या सर्वोच्च नेत्याकडून. विशेष म्हणजे या बैठकीचे संपूर्ण जगामध्ये जाहीर प्रसारण झाले, त्यामुळे संपूर्ण जगाने तेथील वाद पाहिला. या अभूतपूर्व घटनेनंतर युरोपीय देशांनी जाहीरपणे युक्रेनला पाठिंबा दिला असून रशिया-युक्रेन युद्ध कसे थांबवायचे असा नवीन पेच उभा राहिला आहे. व्हाइट हाऊसमध्ये झालेल्या बैठकीत अध्यक्ष ट्रम्प हे झेलेन्स्की यांच्यावर अक्षरशः खेकसत असल्याचे दिसले. व्हाइट हाऊसकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनानुसार ट्रम्प यांनी झेलेन्स्की यांच्यावर लक्षावधी लोकांचे जीव धोक्यात घालत असल्याचा आरोप केला. त्यांच्या या कृत्यांमुळे तिसरे विश्वमहायुद्ध होईल असा इशाराही दिला.

### संपूर्ण जगाने तेथील वाद पाहिला

युद्धसमाप्तीच्या करारासाठी रशियाबरोबर वाटाघाटी करताना युक्रेनची परिस्थिती फारशी चांगली नसून झेलेन्स्की यांच्याकडे नमते घेण्याशिवाय पर्याय नाही असे ट्रम्प यांनी सुचवले. त्याच वेळी झेलेन्स्की यांनी मात्र रशिया आमचे मारेकरी असून त्यांच्याशी कोणतीही तडजोड मान्य नसल्याची भूमिका कायम ठेवली.

# काँग्रेस कार्यकर्त्या हिमानी नरवाल यांची हत्या

## हिमानी नरवाल यांचा मृतदेह एका सूटकेसमध्ये आढळला

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्या हिमानी नरवाल यांचा मृतदेह एका सूटकेसमध्ये आढळून आला आहे. हरियाणातल्या रोहतकमध्ये ही घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत. दरम्यान पक्षाने या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे अशी मागणी केली आहे.**



हरियाणातल्या रोहतक या ठिकाणी शनिवारी सकाळी ११ च्या दरम्यान बस स्थानकावर लोकांची गर्दी जमा झाली होती. त्यावेळी अचानक एकाने निळ्या रंगाच्या सुटकेसकडे पाहिलं. ही सुटकेस रस्त्याच्या कडेला अशीच ठेवण्यात आली होती. कुतुहल असल्याने काही लोक जवळ गेले, मात्र त्यांना काहीसा संशय आल्याने त्यांनी तातडीने पोलिसांना याबाबत माहिती दिली. दरम्यान पोलीस आले आणि त्यांनी ही सूटकेस उघडली तेव्हा त्यांनाही धक्काच बसला कारण या सूटकेसमध्ये एका तरुणीचा मृतदेह होता. हातावर मेहंदी, गळ्यात काळ्या रंगाची ओढणी, पांढरा टॉप आणि लाल रंगाची पँट. या युवतीचा मृतदेह पाहून असं वाटत होतं की गळा दाबून तिला ठार करण्यात आलं आहे त्यानंतर मृतदेह सूटकेसमध्ये ठेवून फेकला आहे. पोलिसांनी तातडीने या ठिकाणी फॉरेन्सिक पथकाला बोलवलं. शनिवारी दुपारपर्यंत ही तरुणी कोण हे समजलं नव्हतं. मात्र नंतर हा मृतदेह काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्या हिमानी नरवाल (HIMANI NARWAL ) यांचा असल्याची माहिती समोर आली. काही लोकांनी मृतदेहाचा फोटो सोशल मीडियावर पोस्ट केला. ज्यानंतर तो व्हायरल झाला. याबाबतची माहिती रोहतकचे आमदार बीबी बात्रा यांना मिळाली. त्यांनी या तरुणीची ओळख पटवली आहे. हिमानी नरवाल ही काँग्रेसमध्ये सक्रीय होती. पक्षाच्या प्रत्येक कार्यक्रमात, आंदोलनात हिरीरीने सहभाग घेत होती. हिमानीने राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेतही अनेकदा सहभाग घेतला होता. राहुल गांधींबरोबरचे तिचे फोटोही सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. याच हिमानी नरवाल ( HIMANI NARWAL ) यांचा मृतदेह रोहतक या ठिकाणी बॅगेत आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी झाली पाहिजे अशी मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. बी.बी. बत्रा यांनी हिमानी नरवाल हत्या ( HIMANI NARWAL ) प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नेमली जावी अशी मागणी केली आहे. तसंच हरियाणातील कायदा आणि सुव्यवस्था संपल्यात जमा आहे असाही आरोप केला आहे. गुन्हेगारांच्या मनात पोलिसांची भीती आणि धाक उरलेला नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या घटना वारंवार घडत आहेत असं त्यांनी म्हटलं आहे.

### बीबी बत्रा यांनी काय म्हटलं आहे?

मुख्यमंत्री भुपेंद्र सिंह हुड्डा यांनीही या घटनेबाबत दुःख व्यक्त केलं आहे. तसंच या तरुणीच्या कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे त्यासाठी सरकारने आवश्यक ती सगळी पावलं लवकरात लवकर उचलली पाहिजेत अशी मागणी केली आहे.काँग्रेसच्या महिला कार्यकर्त्या हिमानी नरवाल यांचा मृतदेह एका सूटकेसमध्ये आढळून आला आहे.

# लोकप्रिय अभिनेता आर. माधवन नेमकं काय म्हणाला?

'शैतान', '३ इडियट्स', 'हिसाब बराबर', 'रहना है तेरे दिल में', अशा अनेक चित्रपटांतून अभिनयाचा ठसा उमटवणारा, अशी अभिनेता आर. माधवनची ओळख आहे. आता एका कार्यक्रमात अभिनेत्याने सोशल मीडियावर तो तरुण मुलींशी फ्लर्ट करतो, असा लोकांचा गैरसमज आहे, असे म्हटले. त्याबरोबरच त्याने हा गैरसमज होण्यामागे काय कारण आहे, याचाही खुलासा केला आहे. हा व्हिडीओ 'रेडिट'वर शेअर करण्यात आला आहे. अभिनेत्याने चैन्नईमध्ये पॅरेंट गिनी या ॲपच्या उद्धाटनादरम्यान सोशल मीडिया वापरताना त्याला कोणत्या गोष्टींचा सामना करावा लागला. याबद्दल बोलताना म्हटले, "पालकांना हे माहीत पाहिजे की, त्यांच्या मुलांनी कधी सोशल मीडिया वापरला पाहिजे. मी एक उदाहरण देतो. मी एक अभिनेता आहे. मला खूप लोक इन्स्टाग्रामवर मेसेज करीत असतात. एका तरुण मुलीने



मला मेसेज केला होता की, मी तुमचा अमुक अमुक चित्रपट पाहिला आहे. मला खूप आवडला. तुम्ही उत्तम अभिनेते आहात. तुम्ही मला प्रेरणा दिली आहे. या मेसेजनंतर खूप हार्ट आणि किसच्या इमोजी होत्या. आता एका चाहत्याने इतक्या चांगल्या पद्धतीने बोलल्याने मी त्या मेसेजला उत्तर दिले. मी मेसेजमध्ये लिहिले खूप खूप धन्यवाद! तुम्ही दयाळू आहात. देव तुमचं भल करो. तिने काय केले मी रिप्लाय दिलेला मेसेजचा स्क्रीनशॉट काढला आणि सोशल मीडियावर पोस्ट केला. लोकांनी काय पाहिलं, तर हार्ट व किस इमोजी असलेल्या मेसेजला मी उत्तर दिलं. लोक असे म्हणू लागले की, मॅडीने हार्ट व किस इमोजी असलेल्या मेसेजला रिप्लाय दिला. माझा उद्देश त्या इमोजींना उत्तर देण्याचा नव्हता; तर तिने लिहिलेल्या मेसेजला देण्याचा होता. पण, लोकांचा असा गैरसमज झाला की, मॅडी तरुण मुलींशी सोशल मीडियावर बोलतो.

## बिपाशा बासूला काम का मिळत नाहीये?

बॉलीवूडमधील असे अनेक कलाकार आहेत, जे सध्या कोणत्याही चित्रपट अथवा वेब सीरिजमध्ये काम करताना दिसत नाहीत. त्यापैकी एक म्हणजे बिपाशा बासू व करण सिंग ग्रोव्हर हे जोडपे. जवळजवळ पाच वर्षे ते कोणत्याही प्रोजेक्टमध्ये अभिनय करताना दिसले नाहीत. ते याआधी शेवटचे भूषण पटेल यांच्या डेंजरस या वेब सीरिजमध्ये एकत्र काम करताना दिसले होते. या वेब सीरिजची निर्मिती प्रसिद्ध गायक मिका सिंग(MIKA SINGH) ने केली होती. मिका सिंगने याआधी याबाबत एका मुलाखतीत या सेलिब्रिटी जोडप्याबरोबर काम करण्याचा अनुभव भयानक होता, असे म्हटले होते. आता पुन्हा एकदा त्याने यावर वक्तव्य केले आहे. मिका सिंगने नुकतीच 'पिंकविला'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत बिपाशाविषयी बोलताना मिका सिंगने म्हटले, "तुम्हाला काय वाटतं? तिला काम का मिळत नसेल? देव सगळं बघतोय", पुढे गायकाने म्हटले, "मला करण आवडायचा. मला 'त्या' चित्रपटाला मदत करायची होती. त्यामुळे माझ्या म्युझिकलासुद्धा फायदा झाला असता. मला फक्त कमी पैशांमध्ये चार कोटींच्या बजेटमध्ये चित्रपट बनवायचा होता. भूषण पटेल यांना दिग्दर्शक म्हणून निवडले, ज्यांनी त्याआधी अलोन या चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते.

## विद्याचा डीपफेक व्हिडीओ व्हायरल

सोशल मीडिया हे माणसाच्या रोजच्या जीवनातील एक महत्त्वाचे माध्यम बनले आहे. सामान्यांपासून ते संपूर्ण जगातील प्रसिद्ध, श्रीमंत व्यक्तींपर्यंत सर्व जण सोशल मीडियाचा करताना दिसतात. आता एआय तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे अनेकविध प्रकारचे व्हिडीओ पाहायला मिळतात. अनेकदा त्यामुळे फसवणूकदेखील होते. मोठमोठ्या प्रसिद्ध कलाकारांचे चेहरे एखाद्या उत्पादनाची जाहिरात करताना दिसतात. आता असाच काहीसा प्रकार अभिनेत्री विद्या बालन(VIDYA BALAN)बरोबर घडल्याचे पाहायला मिळाले. अभिनेत्रीने स्वत: सोशल मीडियावर याची माहिती दिली आहे. बॉलीवूड अभिनेत्री विद्या बालनने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्याबरोबरच त्या व्हिडीओबद्दल तिने माहितीदेखील लिहिली आहे. विद्या बालने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती स्वत: दिसत आहे. त्यामध्ये ती म्हणते, "नमस्कार, मी तुमची आवडती विद्या बालन आहे. आज मी तुम्हाला...", असे दिसत आहे. त्यावर लाल रंगांनी फुली मारून 'स्कॅम अलर्ट', असे लिहिले आहे. हा व्हिडीओ शेअर करताना विद्या बालनने लिहिले, "सध्या सोशल मीडियावर व व्हॉट्सअपवर अनेक व्हिडीओ व्हायरल होत आहेत, ज्यामध्ये मी दिसत आहे. मला हे स्पष्ट करायचे आहे की, हे व्हिडीओ एआय निर्मित असून अनधिकृत आहेत. माझा या व्हिडीओंशी काहीही संबंध नाही. या व्हिडीओंच्या प्रसारात माझा काहीही सहभाग नाहीये. या कंटेटला मी समर्थन देत नाही. माझी सर्वांना विनंती आहे की, हे व्हिडीओ शेअर करण्याआधी त्यामध्ये असलेल्या माहितीची पडताळणी करा. तसेच एआयने निर्माण केलेल्या दिशाभूल करणाऱ्या या व्हिडीओंपासून सावध राहा", असे म्हणत अभिनेत्रीने सोशल मीडियावरील काही व्हिडीओंमध्ये ती दिसत असून, ते एआयने बनवले गेले आहेत, त्यापासून सावध राहा, असा इशारा दिला आहे.विद्या बालनच्या या पोस्टवर अनेक चाहत्यांनी याबद्दल माहिती दिल्याबद्दल तिला धन्यवाद, म्हटले आहे.



## किआरा -सिद्धार्थ दिसले विमानतळावर

बॉलीवूडमधील लोकप्रिय कपलपैकी एक म्हणजे कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा. या कपलचा मोठा चाहता वर्ग आहे. दोन वर्षांपूर्वी दोघांनी मोठ्या थाटामाटात लग्नगाठ बांधून आयुष्याच्या नव्या प्रवासाला सुरुवात केली होती. काही दिवसांपूर्वीच कियारा आणि सिद्धार्थच्या लग्नाला दोन वर्षे पूर्ण झाली आणि त्यानंतर दोघांनी गुड न्यूज दिली.लवकरच कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा आई-बाबा होणार आहेत. २८ फेब्रुवारीला दोघांनी गुड न्यूज दिली. कियाराने बाळाच्या मोज्यांचा फोटो शेअर करत लिहिलं, "आमच्या आयुष्यातलं सर्वात मोठं गिफ्ट लवकरच येत आहे." तेव्हापासून कियारा व सिद्धार्थवर शुभेच्छांचा वर्षाव होतं आहे. या गुड न्यूजनंतर पहिल्यांदाच दोघं विमानतळावर पाहायला मिळाले. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.२ मार्चला सकाळी कियारा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा मुंबई विमानतळावर पाहायला मिळाले. यावेळी सिद्धार्थ कियाराची खूप काळजी घेताना दिसला. कियारा उतरताना गाडीचा दरवाजा उडताना सिद्धार्थ पाहायला मिळाला. त्यानंतर एकमेकांचा हातात हात पकडूनच दोघं चालताना दिसले. यावेळी कियाराने लूज फ्लोरल ड्रेसवर मोकळे केस, डोळ्यावर गॉगल अशा स्टाइलिश अंदाजात दिसली. तर सिद्धार्थने डेनिम जीन्स, पांढरे स्नीकर, पांढरा टी-शर्टबरोबर ब्राउन जॅकेट घातलं होतं. दोघांचा विमानतळावरील हा व्हिडीओ सध्या व्हायरल झाला आहे.

## जिनिलीया व रितेश देशमुख झाले थक्क!

जिनिलीया व रितेश देशमुख यांच्याकडे मनोरंजन विश्वातील आदर्श जोडी म्हणून पाहिलं जातं. या दोघांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. यांची पहिली भेट 'तुझे मेरी कसम' चित्रपटाच्या सेटवर झाली होती. ओळख, मैत्री अन् त्यानंतर या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं. जवळपास १० वर्षे एकमेकांना डेट केल्यावर रितेश व जिनिलीया यांनी २०१२ मध्ये लग्नगाठ बांधली. या जोडप्याला रियान आणि राहिल अशी दोन मुलं आहेत. जिनिलीयाने २०१४ मध्ये रियानला जन्म दिला. यानंतर २०१६ मध्ये या जोडप्याने त्यांचा दुसरा मुलगा राहिलचं स्वागत केलं. अभिनय क्षेत्रातील करिअर सांभाळून अभिनेत्री सध्या आपल्या कुटुंबाकडे सुद्धा तेवढंच लक्ष देताना दिसते. सणवार असो किंवा रियान-राहिलचे शाळेतील कार्यक्रम; जिनिलीया सगळ्या ठिकाणी पुढाकार घेऊन उपस्थित असते. अभिनेत्रीने नुकतीच आपल्या दोन्ही मुलांच्या शाळेत एका कार्यक्रमानिमित्त उपस्थिती लावली होती. यावेळी जिनिलीया आपल्या दोन्ही मुलांमधले कलागुण पाहून थक्क झाल्याचं पाहायला मिळालं. याबाबत पोस्ट शेअर करत तिने दोन्ही मुलांचं कौतुक केलं आहे.जिनिलीया लिहिते, "माझ्या मुलांच्या शाळेतील कान्सर्ट दरवर्षीच खूप सुंदर असतात. आज माझ्या लहान मुलांना परफॉर्म करताना पाहून माझं हृदय आनंदाने भरून गेलं आहे.



# भारताचा न्यूझीलंडवर नेत्रदीपक विजय!

## वरूण चक्रवर्ती व टीम इंडियाचे फिरकीपटू ठरले स्टार

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**श्रेयस अय्यरची ७९ धावांची खेळी, वरूण चक्रवर्तीचे ५ विकेट्स व फिरकीपटूंची भेदक गोलंदाजी या जोरावर भारताने न्यूझीलंडला नमवत ४४ धावांनी मोठा विजय नोंदवला. भारताच्या फिरकीपटू चौकडीने ९ विकेट्स घेत किवीच्या धावांना वेसण घातलं. या विजयासह भारताने गुणतालिकेत पहिलं स्थान गाठलं आहे. टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीत गट टप्प्यातील तिन्ही सामने जिंकत उपांत्य फेरीत पोहोचला आहे.**




यासह भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील उपांत्य फेरीचा सामना ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळवला जाणार आहे.दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर रविवारी २ मार्च रोजी खेळल्या गेलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या शेवटच्या गट सामन्याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. उपांत्य फेरीतील ४ संघ आधीच ठरले होते पण आता कोणता संघ कोणत्या संघाविरूद्ध खेळणार हे निश्चित होणं बाकी होत आणि ते भारत-न्यूझीलंड सामन्याच्या निकालावर ठरणार होते. यासह आता उपांत्य फेरीचे संघ ठरले असून भारत वि. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका हे संघ असणार आहेत.भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीतील तिसरी नाणेफेक गमावली पण सलग तिसरा सामना मात्र जिंकला आहे.

नाणेफेक गमावत भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता आणि भारताची सुरूवात खूपच खराब झाली. भारताने ३० धावांमध्ये ३ विकेट गमावले होते. यानंतर श्रेयस अय्यरने अक्षर पटेलच्या साथीने ९८ धावांची भागीदारी करत संघाचा डाव सावरला. श्रेयस अय्यरने ७९ धावांची तर अक्षर पटेलने ४२ धावांची खेळी केली. न्यूझीलंडकरून वेगवान गोलंदाज मॅट हेन्रीने ५ विकेट्स घेत भारताला जास्त धावा करण्याची संधी दिली नाही.भारताने दिलेले २५० धावांचे लक्ष्य न्यूझीलंड सहज गाठेल असं वाटत होते.

पण भारताने मोठी खेळी करत ४ फिरकीपटू खेळवले आणि किवी संघ फिरकीसमोर फेल ठरले. न्यूझीलंडचा फक्त केन विल्यमसन १२० चेंडूत ७ चौकारांसह ८१ धावा करत बाद झालाय याशिवाय कोणताही फलंदाज ३० धावांचा टप्पा गाठू शकला नाही. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी किवी संघाला एकेका धावेसाठी मेहनत करायला लावली.

अखेरीस भारताने न्यूझीलंडला सर्वबाद करत मोठा विजय नोंदवला.भारताकडून वरूण चक्रवर्तीने १० षटकांत ४२ धावा देत ५ विकेट्स घेतल्या. तर अक्षर, जडेजा, हार्दिकने प्रत्येकी १-१ विकेट तर कुलदीपने २ विकेट्स घेतल्या. आपला पहिला चॅम्पियन्स ट्रॉफी सामना खेळत असलेल्या वरूणने भेदक गोलंदाजी करत सामनावीराचा पुरस्कारही पटकावला.

### चक्रवर्तीने 5 विकेट्स घेतल्या

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीतील उपांत्य फेरीचा सामना ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळवला जाणार आहे.दुबई इंटरनॅशनल स्टेडियमवर रविवारी २ मार्च रोजी खेळल्या गेलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या शेवटच्या गट सामन्याकडे सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. उपांत्य फेरीतील ४ संघ आधीच ठरले होते पण आता कोणता संघ कोणत्या संघाविरूद्ध खेळणार हे निश्चित होणं बाकी होत आणि ते भारत-न्यूझीलंड सामन्याच्या निकालावर ठरणार होते. यासह आता उपांत्य फेरीचे संघ ठरले असून भारत वि. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वि. दक्षिण आफ्रिका हे संघ असणार आहेत.भारताने चॅम्पियन्स ट्रॉफीतील तिसरी नाणेफेक गमावली पण सलग तिसरा सामना मात्र जिंकला आहे. नाणेफेक गमावत भारतीय संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता आणि भारताची सुरूवात खूपच खराब झाली. भारताने ३० धावांमध्ये ३ विकेट गमावले होते.

# बाबर आझमसमोर विराट कोहली शून्य!

## खराब कामगिरीसाठी बाबर आझमलाही जबाबदार धरण्यात येत आहे

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यजमान पाकिस्तान क्रिकेट संघाने चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत खराब कामगिरी केल्यानंतर बाबर आझमवर बरीच टीका होत आहे. त्यानंतर बाबर आझमची तुलना विराट कोहलीशी करू नये, असे अनेक माजी क्रिकेटपटूंनी म्हटले आहे. त्यांच्या मते, बाबर आझमची विराट कोहलीशी कोणतीही स्पर्धा होऊ शकत नाही. अशात आता, मोहसीन खान यांनी माजी पाकिस्तानी क्रिकेटपटूने बाबर आझमची बाजू घेतली आहे.**




मोहसिन खान यांनी उलट मत व्यक्त करताना म्हटले की, “बाबर आझमच्या तुलनेत विराट कोहली शून्य आहे.दरम्यान चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन पाकिस्तानात करण्यात आले आहे, पण त्याचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. पाकिस्तानच्या या खराब कामगिरीसाठी बाबर आझमलाही जबाबदार धरण्यात येत आहे. पाकिस्तानच्या अनेक माजी खेळाडूंसह पाकिस्तानी चाहत्यांनीही बाबर आझमवर मोठ्या प्रमाणात टीका केली आहे.बाबर आझम बॅट चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये काहीच विशेष कामगिरी करू शकला नाही. मात्र, दुसरीकडे विराट कोहलीने पाकिस्तानविरुद्ध दमदार कामगिरी करत शतक ठोकले. पण असे असूनही, मोहसीन खान विराट कोहलीला कमी लेखत आहे. एआरवाय न्यूजवर बोलताना मोहसीन खान म्हणाले, “सर्वप्रथम मी तुम्हाला सांगतो की बाबर आझमच्या तुलनेत विराट कोहली काहीच नाही. कोहली शून्य आहे.” ते पुढे म्हणाले की, “आपण कोण चांगला खेळाडू आहे याबद्दल बोलत नाही आहोत. आपण पाकिस्तान क्रिकेटबद्दल बोलत आहोत, जे पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. कोणतीही योजना नाही, कोणतीही रणनीती नाही, कोणीही जबाबदारी घेत नाही.”२०२५ च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये बाबर आझमची वैयक्तिक कामगिरी बरी होती. पण पाकिस्तान स्पर्धेतून पहिल्याच फेरीत बाहेर पडल्यामुळे त्याला टीकेचा सामना करावा लागला. न्यूझीलंडच्या ३२१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बाबरने ९० चेंडू ६४ धावा केल्या. या डावात त्याच्या स्ट्राईक रेट आणि संथ खेळीवर मोठी टीका झाली.

### आझमची चॅम्पियन्स ट्रॉफीतील कामगिरी

भारताविरुद्धच्या सामन्यात डावाची सुरुवात करताना, बाबर २६ चेंडूत २३ धावा काढून बाद झाला होता. या सामन्यात पाकिस्तानचा सहा विकेट्सनी पराभव झाला आणि त्यामुळे त्यांना स्पर्धेतून बाहेर पडावे लागले होते.दुसरीकडे विराट कोहलीने २०२५ च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत भारताच्या यशात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याने पाकिस्तान विरुद्धच्या सामन्यात शतक झळकावत भारताला विजय मिळवून दिला होता. आज न्यूझीलंड विरुद्धच्या सामन्यात त्याला खास कामगिरी करता आली नसली तरी, तो भारताकडून ३०० एकदिवसीय सामने खेळणारा ७ वा क्रिकेटपटू ठरला आहे.मोहसिन खान यांनी उलट मत व्यक्त करताना म्हटले की, “बाबर आझमच्या तुलनेत विराट कोहली शून्य आहे.दरम्यान चॅम्पियन्स ट्रॉफीचे आयोजन पाकिस्तानात करण्यात आले आहे, पण त्याचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. पाकिस्तानच्या या खराब कामगिरीसाठी बाबर आझमलाही जबाबदार धरण्यात येत आहे. पाकिस्तानच्या अनेक माजी खेळाडूंसह पाकिस्तानी चाहत्यांनीही बाबर आझमवर मोठ्या प्रमाणात टीका केली आहे.बाबर आझम बॅट चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये काहीच विशेष कामगिरी करू शकला नाही. मात्र, दुसरीकडे विराट कोहलीने पाकिस्तानविरुद्ध दमदार कामगिरी करत शतक ठोकले.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
। दि. 3 मार्च 2025।-
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# शिक्षणाबरोबरच खेळांची आवड जोपासणे गरजेचे - हर्षवर्धन पाटील

## ‘युवोत्सव 2025’ मध्ये पीसीसीओईआर, गरवारे, मॉडर्न महाविद्यालयांचा विजय

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज

**जग झपाट्याने बदलत असून सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. विद्यार्थी दशेत शिक्षणाला महत्त्व आहे. परंतु अभ्यासाचे दडपण असेल तर त्याचा शरीरावर परिणाम होतो. मानसिक सुदृढतेसाठी शिक्षणाबरोबरच खेळांची आवड जोपासली पाहिजे. तरच तंदुरुस्त, खंबीर समाज निर्माण होईल. पालकांनीही याकडे जागरूकपणे पाहण्याची आवश्यकता आहे. सर्वांगीण विकास साधत देशाची भावी पिढी सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविण्यासाठी पालक, विद्यार्थी, शिक्षक यांची जबाबदारी आहे, असे मत पीसीईटीचे विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने ‘युवोत्सव २०२५’ या तीन दिवसांच्या क्रीडा स्पर्धेचा समारोप नुकताच पारितोषिक वितरण समारंभाने झाला. यावेळी हर्षवर्धन पाटील बोलत होते. यावेळी उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, एस. बी. पाटील मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर उपस्थित होत्या. दरम्यान स्पर्धेचे उद्घाटन गुरूवारी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, पिंपरी चिंचवड मनपाचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, आरजे अक्षय यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत फुटबॉल, बॉक्स क्रिकेट, बॅडमिंटन आणि व्हॉलीबॉल या क्रीडा प्रकारांचा समावेश होता. पुणे जिल्ह्यासह सातारा जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील एकूण १४५ संघ सहभागी झाले होते.

**स्पर्धेचा सविस्तर निकाल :**

फुटबॉल - प्रथम क्रमांक - गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स, उपविजेते - श्री बालाजी विद्यापीठ, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, आकुर्डी; बॉक्स क्रिकेट (पुरुष) - प्रथम - डी. वाय. पाटील आयएमएस, आकुर्डी, उपविजेते - पीसीसीओई, निगडी, डी. वाय. पाटील कॉलेज, तळेगाव; बॉक्स क्रिकेट (महिला) - प्रथम - पीसीसीओईआर, रावेत, उपविजेते - झील कॉलेज, इंदिरा कॉलेज; बॅडमिंटन (पुरुष) - प्रथम - आनंद बोरा (एमआयटी स्कूल ऑफ डिस्टन्स एज्युकेशन), उपविजेते - रितेश निम्हाळ (पीसीसीओई, निगडी); बॅडमिंटन (महिला) - प्रथम परिनीत मगदूम (बाबुरावजी घोलप कॉलेज, सांगवी), उपविजेते - अमृता गाडेकर (एमआयटी कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय); व्हॉलीबॉल - प्रथम मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर; उपविजेते - पीसीसीओई निगडी, के. बी. पी. सातारा वैयक्तिक विजेते - बॅडमिंटन (पुरुष) - सर्वोत्तम स्मॅशर - आनंद बोरा (एमआयटी स्कूल ऑफ डिस्टन्स एज्युकेशन),; बॅडमिंटन (महिला) - सर्वोत्तम स्मॅशर मिहिका ठाकूर (एमआयटी स्कूल ऑफ डिस्टन्स एज्युकेशन); बॉक्स क्रिकेट (पुरुष) - सर्वोत्तम फलंदाज - आदर्श पवार (डीवायपी आयएमएस); सर्वोत्तम गोलंदाज - प्रथमेश नाथे (पीसीसीओई), सर्वोत्तम क्षेत्ररक्षक - अभिषेक कोठावदे (डीवायपी आयएमएस); बॉक्स क्रिकेट (महिला) - सर्वोत्तम फलंदाज - श्रेया टाकळकर (पीसीसीओईआर); सर्वोतम गोलंदाज - आदिती बिरादर (इंदिरा कॉलेज); सर्वोत्तम क्षेत्ररक्षक - कल्याणी कोळपे (पीसीसीओईआर); व्हॉलीबॉल - सर्वोत्तम सेंटरर - विकास भामरे, सर्वोत्तम ब्लॉकर - संस्कार पावरे, सर्वोत्तम स्मॅशर - विनीत शिंदे; फुटबॉल - सर्वोत्तम गोलकीपर - ललित डोगरा (श्री बालाजी), टॉप गोल स्कोरर - यश गटकळ (डीवायपी सीओई), सर्वोत्तम खेळाडू - प्रेम भयार (गरवारे). पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्मा भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे.





Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42 Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic
Empowering
Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17K+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13K+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org

# ‘झेडएफ इंडिया’च्या कामगारांना 20 हजारांची पगारवाढ!

## आ. महेश लांडगे यांच्या उपस्थितीमध्ये वेतनवाढ करार, चाकण औद्योगिक पट्ट्यातून सर्वाधिक वेतनवाढ

। पिंपरी-चिंचवड । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चाकण औद्योगिक वसाहातीमधील वासुली येथील झेडएफ इंडिया प्रा. लि. व स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यामध्ये परिसरातील सर्वाधिक वेतनवाढ करार करण्यात आला. या करारानुसार कंपनीच्या कर्मचाऱ्यांना 20 हजार 100 रुपयांची भरघोस पगारवाढ मिळाली आहे.**



भारतीय जनता पार्टीचे नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा वेतनवाढ करार करण्यात आला. यावैळी स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटनेचे सल्लागार रोहिदास गाडे, अध्यक्ष जीवन येळवंडे उपस्थित होते. या प्रसंगी संघटनेचे सरचिटणीस कृष्णा रोहोकले, खजिनदार अमृत चौधरी, महादेव येळवंडे, प्रशांत पाडेकर, रविंद्र भालेराव, दत्तात्रय गवारे, यूनिट अध्यक्ष तुषार पवळे, उपाध्यक्ष विक्रम सुक्रे, सरचिटणीस राहुल भोसले, सहचिटणीस अंगद चौधर, खजिनदार आतिब शेख, संघटक प्रतिक कदम, व्यवस्थापनाच्या वतीने कंपनीचे प्लांट हेड. शामबाबू आकुला, एचआर मॅनेजर रवी हंगारगे यांनी करारवर स्वाक्षरी केली. प्रास्ताविक एच. आर हेड रवी हंगारगे यांनी केले, तसेच सूत्रसंचालन पुजा थिगळे यांनी केले. सरचिटणीस कृष्णा रोहोकले यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप केला. कामगारानी पेढे वाटून फटाक्याची अतिषबाजी करुण आनंद व्यक्त केला.

**करारामध्ये झालेले ठळक मुद्दे...**

एकूण पगारवाढ :- २०१००/- (वीस हजार शंभर रुपये ), पगाराचा रेशो:- पहिल्या वर्षी ८०% दुसऱ्या वर्षी १०% तिसऱ्या वर्षी १०% मिळणार., कराराचा कालावधी ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२७ या तीन वर्षांचा राहील., मेडिक्लेम पॉलीसी २०००००/- रुपये संपूर्ण खर्च कंपनी करणार, व जादाची १००००००/- रुपयांची बफर पॉलीसी, या पॉलिसी मध्ये स्वतः, पत्नी, मुले आणि आई वडील यांचा समावेश करण्यात आला आहे, मृत्यू साहाय्य योजना, ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी:- ४० लाख रुपये रक्कम कंपनीकडून वारसदारास देण्यात येईल., दिवाळी बोनस:- कायदेशीर बोनसच्या व्यतिरिक्त अधिकचा CTC च्या बाहेर ८५०१/- रुपये रक्कम बोनस म्हणून देण्यात येईल, व २०००/- रुपये रकमेची एक भेट वस्तू देण्यात येईल. मासिक हजेरी बक्षीस, गुणवंत कामगार पुरस्कार:- प्रत्येक वर्षी दोन गुणवंत कामगारांची निवड करून त्यांना ८५०१/- रुपये एवढी रक्कम बक्षिस म्हणून देण्याचे मान्य, प्रत्येक कामगाराला प्रत्येकी ११ महिन्याचा फरक देण्यात येणार आहे, असे वेतनवाढ करारामध्ये निश्चित करण्यात आले आहे.




Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!